# मिरा भाईंदर महानगरपालिका

**स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,**
**छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे ४०११०१**
**निवडणूक विभाग**

---

**जा.क्र.मनपा/नि.वि./** ५०९ **/२०२५-२६** **दिनांक :-** ०८ / ०१ /२०२६

**प्रति,**
**सिस्टीम मॅनेजर,**
**माहिती व तंत्रज्ञान विभाग,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**विषय :-** **मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६**
**महानगरपालिका संकेतस्थळावर सुधारीत नमुना – ४ व वैध उमेदवार तपशिल सुधारीत यादी प्रसिध्द करणेबाबत.**

**संदर्भ :-** **उपसचिव, राज्य निवडणूक आयोग यांचेकडील क्रमांक/रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.८०/का-५, दि. ०३ जानेवारी, २०२६ रोजीचे पत्र.**

मिरा-भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या अनुषंगाने वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी (नमुना - ४) महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला आहे. तथापी, महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीतील प्रभाग क्र. २२ (ड) मधुन उमेदवारी अर्ज दाखल केलेले उमेदवार श्री. जावेद अख्तर इमाम पठाण यांचे दि. ३०/१२/२०२५ रोजी निधन झाले आहे.

याबाबत, मा. राज्य निवडणूक आयोग यांचेकडून दि. ३१/१२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये मार्गदर्शन मागविण्यात आले होते. मा. राज्य निवडणूक आयोगाने संदर्भिय पत्रान्वये, कै. जावेद अख्तर इमाम पठाण यांचे नाव दि. ३१/१२/२०२५ रोजी प्रसिध्द केलेल्या वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांच्या यादीमधून वगळण्याचे निर्देश दिलेले आहेत.

सबब, मा. राज्य निवडणूक आयोग यांचे निर्देशानुसार कै. जावेद अख्तर इमाम पठाण यांचे नाव दि. ३१/१२/२०२५ रोजी प्रसिध्द केलेल्या वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांच्या यादीमधून वगळण्यात आलेले असुन सुधारीत यादी (नमुना – ४) व वैध उमेदवार तपशिल सुधारीत यादी महानगरपालिका संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

**(डॉ. सचिन बांगर)**
**उपायुक्त (मु.) तथा उप निवडणूक अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६

### नमुना ०४ नुसार वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची सुधारीत संख्या

(मा. राज्य निवडणूक आयोग यांचेकडील क्रमांक-रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.८०/का-५, दि. ०३ जानेवारी, २०२६ रोजीच्या निर्देशानुसार)

दि. ०३ जानेवारी, २०२६

| अ.क्र. | निवडणूक निर्णय अधिकारी क्रमांक | वैध उमेदवार |
|---|---|---|
| १ | १ | ६४ |
| २ | २ | ६१ |
| ३ | ३ | ८४ |
| ४ | ४ | ८१ |
| ५ | ५ | ९५ |
| ६ | ६ | ६८ |
| ७ | ७ | ९४ |
| एकुण | | ५४७ |

(डॉ. सचिन बांगर)
उपायुक्त (मु.) तथा उप निवडणूक अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका